**भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र**

(सकाळ)

जा.क्र. ६५१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १९/०९/२०१७

**१) महिलेला मारहाण करून विनयभंग केल्याने गुन्हा नोंद**

दिनांक १७/०९/२०१७ चे २०.०० वा दर. यातील फिर्यादी ही आपले घरी एकटी हजर असतांनी यातील आरोपी क्र. १ नी फिर्यादीस तु माझे वहीनीच्या चुगल्या करुन बदनामी करतेस असे म्हणुन शिवीगाळ करुन लाथा बुक्यांनी मारपीट केले व आरोपी क्र. २ नी डोक्याचे केस पकडुन ओढतान करुन खाली पाडुन लाथा बुक्यांनी मारपीट करुन विनयभंग केल्याने फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५४(ब),३२३,५०४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. आत्राम पो.स्टे भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) घरातील सोन्याचे दागिने व नगदी पैशाची चोरी. :–**

**अ)** दिनांक १७/०९/२०१७ चे २२.०० वा दर. यातील फिर्यादी ज्ञानेश्वर तुकाराम कावरे वय ४८ वर्ष रा. गुंजेपार हा घरी झोपला असता कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीच्या घराचे मागील दरवाजाचा कोंडा तोडुन आत मध्ये प्रवेश करून आलमारीत ठेवलेले दोन सोन्याचे गोप प्रत्येकी १० ग्रॅम, ३ सोन्याचे झुमके,चांदीचे दागिने ५०० ग्रॅम व नगदी ७०००/– रूपये असा एकुण ४८,००० /– रूपयाचा माल चोरून नेल्याने असे फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना उईके पो.स्टे.लाखांदुर हे करीत आहेत.

**ब)** दिनांक १७/०९/२०१७ चे २२.०० ते १८/०९/१७ चे ०१.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी बाबुराव वासु सोनटक्के वय ६४ वर्ष रा.किन्ही गुंजेपार हा घरात झोपला असता कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीच्या घराचे मागील दाराची साखळी काढुन आत प्रवेश करून घरात ठेवलेली टिनाची कोठी मधील सोन्याची अंगठी ०३ ग्रॅम व नगदी ५०००/– रूपये असा एकुण १५०००/– रूपये चोरून नेल्याने असे फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना उईके पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**३) मोबाईलची चोरी. :–**

दिनांक १७/०९/२०१७ चे १९.३० वा दर. यातील फिर्यादी प्रतापसिंह सरदारसिंह परमार वय ५२ वर्ष रा. गोंडे गाव याने आपल्या किराण दुकानात कॉऊटवर ठेवलेला सॅमसंग गॅलेक्सी कंपनीचा जे/७ मोाबाईल हॅन्डसेट किं.११०००/– रूपये कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याने असे फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ.कोल्हे पो. स्टे.पालांदुर हे करीत आहेत.

**४) लाकडी दरवाजे, खिडकी, लोखंडी सलाखीची चोरी . :–**

दिनांक २८/०८/२०१७ चे २२.०० ते २९/०८/२०१७ चे ०६.०० वा दर. यातील फिर्यादी दिनेश भगवानदास जावरानी वय ४७ वर्ष, रा. गुरुनानक नगर तुमसर यांनी नगर पालीका दुकान चाळीचे वरील माळयावर खुली जागा लिजवर घेतल्याने कोणीतरी अज्ञात चोराने खुल्या जागेत ठेवलेले जुने लाकडी दोन दरवाजे, जुनी लाकडी दोन खिडकी ७००/–रु. किलो लोखंडी सलाख असा एकुण १२,०००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. चिचखेडे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**५) मोबाईल चोरी करण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १७/०९/२०१७ चे १४.०० वा. दर. यातील फिर्यादी अब्दुल रहीम खान हबीब खान वय ५२ वर्ष, रा. सिडीकेंट कॅम्प डोंगरी बु. हा आठवडी बाजार करीत असतांनी यातील आरोपीने फिर्यादीचे शर्टसचे समोरील खिश्यात ठेवलेला ओपो कंपनीचा मोबाईल हात घालुन चोरण्याचा प्रयत्न केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३७९, ५११ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. लिल्हारे पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**६) गैरकायदयाची मंडळी जमवुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन भांडण करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १७/०९/२०१७ चे १७.३० वा. दर. यातील फिर्यादी व आरोपीतांचे जागेच्या जुन्या वादावरुन यातील आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन सार्वजनीक जागेत फिर्यादीचे घरासमोरील रोडवर उभे होवुन फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन काठीने फिर्यादीला व तिच्या आई, भावा सोबत मारपीट, भांडण करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे लेखी व डॉ. रिपोर्ट वरुन रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १४३,१४७,२९४,३२३,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**७) अवैध दारू/जुगार अडयावर धाडी . :–**

दिनांक १८/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, करडी, कारधा, अडयाळ, व लाखांदुर येथे अवैध दारू/जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून ३२ लिटर हा.भ. दारू किंमती २६००/–रु, ३ लिटर ५१० मिली लिटर देशी दारु किंमती १०१४/–रु. तसेच जुगारातुन किंमती २८५/–रु. असा एकुण किंमती ३८९९/–रु. माल जप्त करण्यात आला आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
**पोलीस उपअधिक्षक (गृह)**
**भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.